# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २९/१०/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २८/१०/२०२४ रोजी चे ०५.०० वा. ते ०५.३० वा. दरम्यान पो. स्टे. रामटेक हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना टाटा योदधा कंपनीचा गाडी क्र. MH-49-BZ-3904 मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने नेरला शिवारात नाकाबंदी दरम्यान टाटा योद्धा वाहनास थांबण्याचा इशारा केला असता चालकाने गाडी रोडवर थांबवुन गाडी सोडुन पळुन गेला. त्या दरम्यान गावातील लोकांनी धावुन पकडले. स्टाफने मालवाहू गाडीची पाहणी केली असता गाडी क्र. MH-49-BZ-3904 मध्ये १४ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने चालक व वाहक यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून टाटा योदधा कंपनीचा गाडी क्र. MH-49-BZ-3904 किंमती ५,००,०००/—रू. मध्ये **१४** गोवंशिय जनावरे किंमती कि. १,७५,०००/—रू. चा मुद्देमाल असा एकुण ६,७५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून **क्लीनर नामे— १) फैजल मो. कलाम कुरेशी, वय १९ वर्ष, रा. सईदनगर कामठी २) टाटा योदधा MH-49-BZ-3904 चा चालक नामे— सोहेल उर्फ राजा शेख, वय ३० वर्ष, रा. भाजीमंडी कामठी** यांचे विरूद्ध कलम ३२५ बीएनएस सहकलम ११(१) (डी) प्राण्यांना छळ प्रति. अधि. १९६० सहकलम ५ अ(१), ५ बी महा. पशु संरक्षण अधि. १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार पोनि आसाराम शेटे, पोहवा नारायण भोयर, पोअं. चैतन्य मेश्राम, सुदत्ता पाटील यांनी केलेली आहे.

# जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २८/१०/२०२४ रोजी चे सकाळी ०८.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान पो. स्टे. रामटेक हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना मालवाहू टाटा आयसर गाडी क्र. MH-29/BE-7771 मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने बोरी शिवारातील घोटीटोक पॉईंट येथे नाकाबंदी दरम्यान टाटा आयसर वाहनास थांबवुन स्टाफने गाडीची पाहणी केली असता गाडी क्र. MH-29/BE-7771 मध्ये १६ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने चालक व क्लीनर यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून टाटा आयसर गाडी क्र. MH-29/BE-7771 मध्ये १६ गाई प्रत्येकी किंमती १०००० रू प्रमाने एकुन किंमती १,६०००० रू कालवाडी ११ गाई प्रत्येकी किंमती ५००० रू प्रमाणे एकुण किंमत १५००० रू ०२ मत गई प्रत्येकी किंमती १०००० रू प्रमाणे एकुण किंमत २०००० रू टाटा आयसर कंपनीची मालवाहु गाडी क्र एम एच २९ बीई ७७७१ किंमत ८०,०००० रू असा एकुन १,०५०,००० रू चा माल मिळुन आला. सदर सर्व जनावर यांना चारापाणि ची सोय व देखभालीसाठी गो विज्ञान अनुसंधान केंद्र देवलापार ता रामटेक येथे ३० जनावरे जमा करण्यात आले असून **आरोपी सुशिल गोविंद सर्वे ४० वर्ष रा यशोधारा नगर नागपुर रामटेक नागपुर २) अजय श्यामलाल चौधरी वय ४० वर्ष रा यशोधरा नगर नागपुर** यांचे विरूद्ध कलम ३२५ बीएनएस ११(१) डी,५ प्राण्या, ५ अ (१),५ बी पशु अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार पोनि आसाराम शेटे, पोहवा हरीशंकर ठाकुर, रोहीत मांडवगडे, पोना मंगेश सोनटक्के, पोअं. शेषराज उके, शरद गिते, पोना प्रफुल रंधई यांनी केलेली आहे.

## देवलापार पोलीसांनी वाचविले २९ गोवंश जनावरांचे प्राण

देवलापार पोलीस स्टेशनचे ठाणेदार नारायण तूरकुंडे सोबत स्टाफसह दिनांक २९/१०/२०२४ रोजी पोलीस परिसरात पेट्रोलिंग करित असताना पहाटे ०४/०० वाजता दरम्यान गुप्त बातमीदार कडून खबर मिळाली कि, जबलपूर कडून नागपूरकडे NH-44 रोडने लाल रंगाचा वर ताडपत्री बांधून असलेला दस चक्का गाडी क्र. MH-31/CB-5969 मध्ये गौवंश जनावरे कोंबुन कत्तलीकरिता घेवून जात आहे. अशा मूखबीरचे मिळालेल्या खबरेवरून ठाणेदार नारायण तूरकुंडे यांनी मानेगाव चेक पोस्ट. वरिल कर्मचारी पो.हवा सचिन शर्मा, पो. शि सचिन येळकर यांना मिळालेली माहीती देउन सतर्कपणे नाकाबंदी करणे बाबत सांगितले असता काही वेळातच मानेगाव चेक पोस्ट जवळ वरील वर्णाचा ट्रक आला असता कर्मचारी यांनी ट्रक थांबवणे बाबत हाताचा इशारा दाखवला असता सदर चालकाने येथे ट्रक न थांबता विरुद्ध बाजूने ट्रक टाकून विरुद्ध दिशेने ट्रक भरधाव वेगाने चालवून देवलापार कडे निघून गेल्या बाबत ठाणेदार यांना सांगितले असता ठाणेदार तुरकुंडे यांनी तसेच जिल्हागस्त ड्युटीवर असणारे मा. श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक, नाईट अंमलदार म.पो.हवा आशा कुमरे, पो.ना शिवचरण नागपुरे, पो.ना नितेश पिपरोदे, प्रवीण सलामे, चा.पो.हवा बंटी गेडाम यांचे सह पोलीस स्टेशन देवलापार समोर नाकाबंदी लावली असता एक ट्रक हा नाकाबंदी पासून १०० मिटर अंतरावर नाकाबंदी पाहून ऐकाएक थाबला. सदर ट्रकजवळ जात असतांना ट्रकचा चालक हा खाली उतरून जंगलामध्ये अंधाराचा फायदा घेउन पळून गेला. सदर १० चक्का ट्रक गाडी क्र. MH-31/CB-5969 या गाडीमध्ये गौवंश जनावरांना अत्यंत क्रूर पध्दतीने गाडीमध्ये आखूड दोरीने पाय तोंड बांधून त्यांना कत्तलीकरिता वाहतूक करताना एकूण २९ गोवंश जनावरे किंमती ३,७५,०००/—रू मिळून आले. व ट्रक अंदाजे किंमत २५,०००००/— रू असा एकूण २८,७५,०००/— चा मुद्देमाल जप्त करून सदर गोवंश जनावरांना पालन पोषण करिता गौ—विज्ञान अनुसंधान केंद्र देवलापार येथे दाखल करण्यात आले. सदर बाबत देवलापार पोस्टे येथे गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांचे मार्गदर्शनात पोस्टे देवलापार ठाणेदार नारायण तूरकुंडे, पोउपनि हरिहर सोनकुसरे, पो.हवा सचिन शर्मा, नितेश पिपरोदे, म.पो.हवा आशा कुमरे, पो. ना शिवचरण नागपूरे, पो.शि सचिन येळकर, प्रवीण सलामे, केशव फड, मनीष चौकसे, चा. पो. हवा बंटी गेडाम, लक्ष्मण गायकवाड यांनी केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**